MHST060007722022

**सं.फौ.ख.क्र.२४६/२०२२**
**नि. क्र. १२ लगत**

**न्यायनिर्णय**
**(घोषीत दिनांक ०६ एप्रिल, २०२४)**

अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही. टी. निरगुडे आणि आरोपीच्यावतीने विधीज्ञ श्री. व्ही. एल. काळे यांनी केलेला युक्तिवाद श्रवण केला. कागदपत्राचे अवलोकन केले. प्रस्तुत खटल्यात, खालील मुद्दे निष्कर्षासाठी उपस्थित झालेले आहेत. त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसासहीत खालीलप्रमाणेः–

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १६/०३/२०२२ रोजी मौजे दहिवडी, ता. माण, जि. सातारा हद्दीतील एस. टी. स्टँड जवळ भिंतीचे आडोशाला उघडयावर आरोपी बिगरपरवाना कल्याण नावाचा मटका स्वतःचे फायदयाकरीता लोकांच्याकडुन पैसे स्वीकारुन खेळत असताना जुगाराचे साहित्य व रोख रक्कम ११६०/– बाळगल्याचे स्थितीत मिळून आल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | **नाही...** |
| २. | अंतिम आदेश काय ? | **आरोपीस निर्दोष मुक्त केले.** |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्रमांक १ बाबतः–**

२. फौजदारी खटल्यामध्ये आरोपी निर्दोष आहे, हे गृहितक मुळ तत्व आहे. आरोपीवरील गुन्हा संशयातीतरित्या शाबित होणे अनिवार्य आहे. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने खटल्याच्या पुष्टयर्थ फिर्यादी सा. क्र.१ केतन रविंद्र बर्गे पोलीस शिपाई व जप्ती पंचनाम्यावरील पंच सा.क्र.२ अशोक शिवलिंग भुईंजकर व असे एकुण दोन साक्षीदारांच्या साक्षी नोंदविण्यात आलेल्या आहेत. जप्ती पंचनाम्यावरील साक्षीदाराने

अभियोग पक्षास अभिप्रेत असल्याप्रमाणे जबाब न दिल्या कारणामुळे, इतर साक्षीदाराच्या साक्षी नोंदवुन प्रस्तुत प्रकरणाच्या गुणवत्तेवर कुठलाही परिणाम होणार नसल्याकारणामुळे अभियोग पक्षाने नि. क्र. ०१ वर पुरावा बंद करण्याचा आदेश पारित करण्यात आला.

३. फिर्यादी सा.क्र.१ केतन रविंद्र बर्गे यांच्या साक्षीवरुन असे ध्वनित होते की, दिनांक १६.०३.२०२२ रोजी पोलीस स्टेशन, दहिवडी येथे पोलीस शिपाई पदावर कार्यरत असतांना त्यांना तासगावकर यांनी दिलेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलीस हवालदार खांडेकर, पोलीस नाईक वाघमारे, दोन होमगार्ड व सोबत दोन पंचाना घेऊन बातमीच्या ठिकाणी छापा टाकला असता आरोपीकडे एक स्लीप बुक, निळया रंगाचा कार्बनचा तुकडा, निळया शाईचा बॉलपेन व रोख रक्कम ११६०/– मिळून आले. पंचासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला. जप्त मुद्देमाल, पोलीस ठाण्यात मुद्देमाल जमा केला. आरोपीविरुध्द नि.क्र.१३ प्रमाणे फिर्याद दाखल केली. शासनाच्यावतीने आरोपीविरुध्द गु.र.क्र. ६२/२०२२, महाराष्ट्र जुगार अधिनियम कायदा कलम १२ अन्वये फिर्याद दिली. इतर सर्व सुचक प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिली.

४. जप्ती पंचनाम्यावरील पंच सा. क्र. २ अशोक शिवलिंग भुईंजकर यांनी अभियोग पक्षास अभिप्रेत असल्याप्रमाणे जबाब दिलेले नाही. त्यामुळे, भारतीय पुरावा कायदा, १८७२ कलम १५४ प्रमाणे अभियोग पक्षाला साक्षीदाराला उलटतपासात विचारल्या जाणा–या प्रश्नासारखे प्रश्न विचारण्याची संधी दिली असता, त्यात आरोपीविरुध्द काहीही निष्पन्न झालेले नाही.

५. प्रस्तुत प्रकरणामध्ये पंच सा. क्र. २ अशोक शिवलिंग भुईंजकर यांनी आरोपीविरुध्द काहीही न सांगितल्यामुळे मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आला, हे निःसंशयरित्या सिध्द होत नाही. उपरोक्त परिस्थितीमध्ये जप्ती पंचनाम्यावरील सा.क्र.२ भुईंजकर यांनी अभियोग पक्षास अभिप्रेत असल्याप्रमाणे जबाब न दिल्याकारणामुळे आरोपीचा जप्त मुद्देमालाशी संबंध असल्याबाबत कुठलाही सबळ पुरावा अभिलेखावर आणण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरलेला आहे. तसेच, सदर प्रकरणातील मुद्देमाल न्यायालयात जमा नसलेने पोलिसांनी केलेल्या कारवाई बाबत संशय निर्माण होतो. सा. क्र. १ केतन रविंद्र बर्गे, पोलीस साक्षीदार असुन त्यांची साक्ष साधारण स्वरुपाची असल्यामुळे आरोपीविरुध्द उपरोक्त कलमान्वये गुन्हा सिध्द होत नाही.

६. सबब, उपरोक्त मुद्यावर जास्त ऊहापोह न करता विनासंकोच, मी या तथ्यविषयक व विधीविषयक निष्कर्षास येत आहे की, अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द असलेल्या कलमाप्रमाणे आवश्यक असलेला कुठलाही पुरावा न्यायालयासमोर न आणल्याकारणाने संशयाचा फायदा देऊन आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ बाबतः</u>–**

७. मुद्दा क्रमांक १ च्या नकारार्थी निष्कर्षावरुन आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. जप्त मुद्देमाल नियमाप्रमाणे विल्हेवाट करण्यासाठी संबधीतांना आदेश देणे न्यायोचीत होईल. परिणामतः पुढीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करीत आहेः–

## आदेश

१) आरोपी मनोज शिवाजी शिंदे यांची महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कायदा १८८७, कलम १२(अ), या गुन्ह्यातून फौजदारी व्यवहार संहिता, १९७३ कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येतो व जामीनदारास बंध मुक्त करण्यात येते.

३) फौजदारी व्यवहार संहिता, १९७३ कलम ४५२(१) अन्वये जप्त मुद्देमाल एकूण रोख रक्कम रुपये ११६०/– (अक्षरी रक्कम रुपये एक हजार एकशे साठ फक्त) सरकार जमा करण्यात यावी. मुद्देमाल एक निळया शाईचा बॉलपेन, स्लिप बुक हे निरुपयोगी व मुल्यहीन असल्याने नष्ट करण्यात यावे.

४) आरोपीने फौजदारी व्यवहार संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये न्यायालयाच्या न्यायनिर्णयाविरुध्द दाखल केलेल्या जाणा–या अपीलाबाबत अपीलीय न्यायालय नोटीस देईल, त्यावेळी, अपीलीय न्यायालयासमोर उपस्थित राहण्याबाबतचे रक्कम रुपये १५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र द्यावे. सदरचे बंधपत्र सहा महिन्याचे कालावधीकरीता अंमलात राहील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला आहे.)

SIDDHARTH BABAJI SOMNATH GADVE
Digitally signed by SIDDHARTH BABAJI SOMNATH GADVE
Date: 2024.04.18 12:06:23 +0530

दहिवडी
दिनांकः ०६.०४.२०२४

(एस. एस. गाडवे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दहिवडी.

## <u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ्. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : प्र. रा. कांबळे, लघुलेखक ग्रेड–३ |
| न्यायालयाचे नाव | : सह दिवाणी न्यायाधीश व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दहिवडी. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : ०६.०४.२०२४ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : ०६.०४.२०२४ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : १८.०४.२०२४ |

............